MHNS130002972022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :– | १५/०३/२०२२ |
| नोंदणी तारीख | :– | १५/०३/२०२२ |
| निकाल तारीख | :– | १२/०३/२०२६ |
| कालावधी | :– | वर्ष महीना दिवस |
| | | ०३ ११ २८ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पिंपळगांव ब., ता.निफाड, जि.नाशिक.**

**(पिठासीन अधिकारी श्री.ए.जे. पाटील)**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.५१/२०२२** **निशाणी क्रमांक ९७**

| | |
|---|---|
| **अर्जदार –** | **१. प्रतिभा संदीप पगार,** वय ३७, व्यवसायः– घरकाम |
| | **२. कु.आर्या संदीप पगार,** वय ११, व्यवसायः– शिक्षण |
| | **३. चि.प्रसन्न संदीप पगार,** वय, व्यवसायः– शिक्षण<br>अर्जदार क्र.१ स्वतःसाठी व अर्जदार क्र.२ व ३ ची अ.पा.क.म्हणून सर्व रा.द्वारा– श्री.सतिष वसंत शेवाळे, टाईप २बी–११६०, आंबेडकर गार्डन जवळ, एचएएल टाऊनशिप, ओझर, ता.निफाड, जि.नाशिक. |
| **अर्जदारातर्फे विधीज्ञा –** | श्रीमती एच.बी.ठुबे |
| **जाबदार –** | **संदीप केशव पगार**, वय–४२ वर्षे, व्यवसायः– नोकरी<br>रा.फुले नगर, मु.पो.चांदवड, जि.नाशिक.<br>(नेमिनाथ जैन ब्रम्हचारी आश्रम, के.एच.आबड, कला आणि वाणिज्य, वरिष्ठ महाविद्यालय, नेमिनाथ चांदवड, ता.चांदवड, जि.नाशिक) |
| **जाबदारांतर्फे विधिज्ञा –** | श्रीमती व्ही.जे. बाविस्कर |

## न्यायनिर्णय

**(घोषित दिनांक १२ मार्च, २०२६)**

०१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (येथुन पुढे त्यास ***''फौ.प्र.सं.'*** असे संबोधन्यात येते) चे कलम १२५ अन्वये अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**अर्जदारांचे संक्षिप्त कथन खालीलप्रमाणे** –

०२) अर्जदार क्र.१ व जाबदाराचा विवाह दि.०८/०३/२०११ रोजी दोधेश्वर, ता.सटाणा, जि.नाशिक येथे झाला. उभयंताचे नातेसंबंध अद्यापपावेतो कायम आहेत. विवाहसंबंधातून त्यांना अर्जदार क्र.२ व ३ ही अज्ञान अपत्ये आहेत. उभयंताचा लग्नाचा खर्च अर्जदार क्र.१ हिचे आईवडीलांनी केला. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही नांदण्यासाठी मौजे देवळाणे येथे जाबदाराकडे गेली. लग्नाच्या २ ते ३ महिन्यानंतर जाबदाराने अर्जदार क्र.१ हिचा छळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर जाबदाराचे वडीलांनी अर्जदार क्र.१च्या वडीलांकडे रु.१ लाखाची मागणी केली. त्यावर अर्जदार क्र.१च्या वडीलांनी २ ते ३ दिवसांत मदत करतो असे सांगितले तेव्हा जाबदाराच्या वडीलांना राग येवून त्यांनी अर्जदार क्र.१ च्या लग्नात दिलेली सोन्याची चैन मोडून टाकली. तसेच जाबदार हा अर्जदार क्र.१ हिस तिच्या आईवडीलांसोबत फोनवर बोलु देत नसे. अर्जदार क्र.१ हिस तिच्या आई वडीलांचा तसेच भावाचा फोन आल्यास जाबदार हा अर्जदार क्र.१ हिस शिवीगाळ करायचा. तसेच अर्जदार क्र.१ ही डी.एड. चे शिक्षण घेत होती. तिला उत्कृष्ट विद्यार्थीनी म्हणून रक्कम रु.५०००/– चा पुरस्कार मिळाला. ती रक्कम देखील जाबदाराने अर्जदार क्र.१ कडून घेतली.

०३) दि.०२/१२/२०११ रोजी अर्जदार क्र.१ हिस मुलगी झाली. त्यावेळी दवाखान्याचा खर्च अर्जदार क्र.१ हिच्या आईवडीलांनी केला. जाबदार हा अर्जदार क्र.२ हिस भेटण्यासाठी आला नाही अथवा काही विचारपुस केली नाही. मुलगी झाली म्हणून नाराजी व्यक्त केली. त्यानंतर जाबदाराने मालेगांव येथे बी.एड.साठी प्रवेश घेतला. त्याचा संपुर्ण खर्च अर्जदार क्र.१ च्या आईवडीलांनी केला. नोव्हेंबर २०१२ मध्ये अर्जदार क्र.२ ची तब्येत चिंताजनक होती. तिला गिरणा हॉस्पीटल येथे भरती केले

होते. जाबदाराने त्यावेळी अर्जदार क्र.२ ची काळजी घेतली नाही अगर दवाखान्याचा खर्च केला नाही. जाबदार हा अर्जदार क्र.१ व २ यांच्याकडे दुर्लक्ष करीत होता. तसेच त्यांना शारिरीक व मानसिक त्रास देत होता. त्यानंतर जाबदारास कायमस्वरुपी नोकरी मिळेल या आशेने अर्जदार क्र.१ ही त्याचेसोबत वानवडी, पुणे येथे स्थलांतरीत झाली. तेथे देखील जाबदार हा अर्जदार क्र.१ हिस त्रास देत होता. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही पुन्हा गरोदर राहिली. अर्जदार क्र.१ ही ७ महिन्यांची गरोदर असतांना अर्जदार क्र.१ चा भाऊ सतिष हा तिला घेणेसाठी आला. तेव्हा जाबदाराने यावेळी मुलगा झाला पाहिजे असे सांगितले. मुलगा नाही झाला तर अर्जदार क्र.१ हिला नांदविण्यास नकार दिला. त्यानंतर अर्जदार क्र.१ हिस मुलगा झाला. त्यास देखील जाबदार व त्यांचे कुटुंबीय भेटण्यास आले नाही. अर्जदार क्र.१ हिचे वडीलांनी तिस पुणे येथे घेवून आले. तेथे देखील जाबदाराने अर्जदार क्र.१ हिच्या वडीलांना आडूनपाडून बोलुन त्यांना शिवीगाळ केली.

०४) नोव्हेंबर–२०१५ मध्ये चांदवड येथील एस.एन.जे.बी. या संस्थेमध्ये जाबदारास पुर्णवेळ प्राध्यापकाची नोकरी मिळाली. त्यावेळी अर्जदार क्र.१ हिस वाटले की, आता जाबदार चांगला वागेल व मुलांकडे लक्ष देईल म्हणून अर्जदार क्र.१ ही सर्व त्रास सहन करुन संसार करीत होती. जानेवारी २०१६ मध्ये अर्जदार क्र.१ ही जाबदार यास जेवण देत असतांना जाबदाराने काहीही विचारपुस न करता अर्जदार क्र.१ हिला मारहाण केली. तिचा मोबाईल फोडला. त्यावेळी अर्जदार क्र.१ दवाखान्यात गेली. तेथे तिला समजले की, ती पुन्हा गरोदर आहे. जाबदाराने तिला गर्भपात करण्यास सांगितले. अर्जदाराने कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली. त्यानंतर अर्जदार क्र.१ ही २ ते ३ महिने माहेरी राहिली. नातेवाईकांनी मध्यस्थी करुन अर्जदार क्र.१ हिस जाबदाराने चांदवड येथे घेवून आला. तेथे पुन्हा अर्जदार क्र.१ हिस शिवीगाळ व मारहाण केली. तसेच अर्जदार क्र.१ हिस तु घटस्फोटीत आहे असे म्हणून हिनविले. अर्जदार क्र.१ हिने नर्सिंग

स्कुलमध्ये जॉब पत्कारला व त्यातून मिळणारा संपुर्ण पगार हा जाबदाराला देत असे. जाबदाराने अर्जदार क्र.१ हिच्या वडीलांचा सटाणा येथे असलेला प्लॉट मिळावा म्हणून अर्जदार क्र.१ हिस त्रास दिला. अर्जदार क्र.१ चे वडील तो प्लॉट जाबदारास देण्यास तयार झाले. त्याचा संपुर्ण खर्च अर्जदार क्र.१ हिच्या वडीलांनी करावा म्हणून जाबदार अर्जदार क्र.१ हिस त्रास देत होता. जाबदार हा रात्री अपरात्री फोनवर बोलायचा. याबाबत अर्जदार क्र.१ हिने विचारणा केली असता जाबदाराने तिला मारहाण केली. जाबदारास बाहेरख्यालीपणाचा नाद असल्याचे अर्जदार क्र.१ हिला समजले. जाबदार हा अर्जदार क्र.१ ते ३ कडे व संसाराकडे लक्ष देत नव्हता. किरकोळ कारणांवरुन जाबदार हा अर्जदार क्र.१ हिस शिवीगाळ करायचा. जाबदाराने अर्जदार क्र.१ हिस तु इथुन निघुन जा मला तुझ्या सोबत संसार करावयाचा नाही असे म्हणून घरातून काढून दिले. अर्जदार क्र.१ने दि.२०/०२/२०२१ रोजी जाबदारास नांदायला नेण्यासाठी नोटीस पाठविली. त्याला जाबदाराने त्या नोटीसीस चुकीचे उत्तर पाठविले. त्यामुळे अर्जदाराला सदरचा अर्ज करणे भाग पडले.

०५) जाबदारास नोकरीतुन दरमहा रु.१ लाख पगार व शेतीतून दरसाल रु.१० लाख उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. याउलट, अर्जदार क्र.१ ने तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसून ती स्वतःचे व मुलांचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे असे कथन केले आहे.

०६) अर्जदारांनी सदर अर्जामध्ये जाबदाराकडून खालीलप्रमाणे मागणी केली–

*(i) अर्जदार क्र.१ ते ३ यांना जाबदाराकडून प्रत्येकी दरमहा रु.१५,०००/– म्हणून एकुण रक्कम रु.४५,०००/– स्वतंत्र अन्नवस्त्र म्हणून अर्ज दाखल तारखेपासून दयावे.*

*(ii) सदरच्या अर्जाच्या खर्चापोटी रु.३०,०००/–.*

०७) जाबदाराने (निशाणी १७) कडे त्याचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शविला आहे. जाबदाराच्या कथनाप्रमाणे अर्जदार क्र.१ व जाबदार यांचा दि.०८/०३/२०११ रोजी मौजे दोधेश्वर येथे विवाह झाला. परंतु अर्जदार क्र.१ व जाबदार या दोघांचाही तो दुसरा विवाह असल्यामुळे तो बेकायदेशीर आहे. अर्जदार क्र.१ हिचा पुर्वी नंदुरबार येथील इसमासोबत विवाह झाला आहे व अद्यापही कायम आहे. त्यांच्यामध्ये अद्याप घटस्फोट झालेला नाही. लग्नानंतर अर्जदार क्र.१ ही जाबदाराच्या घरी एकत्र कुटुंबात नांदायला आली. परंतु, काही दिवसांनी ती जाबदार व त्याच्या कुटुंबीयांना त्रास देवू लागली. जाबदाराने स्वतःच्या व अर्जदार क्र.१ च्या शिक्षणाचा खर्च केला आहे. जाबदाराने अर्जदार क्र.१ व मुलांचा वैद्यकीय खर्च देखील केला आहे. जाबदाराने अर्जदार क्र.१ हिच्या वादविवादामुळे तिच्या नावावर शेती केली आहे. अर्जदार क्र.१ ने वारंवार जाबदाराकडे फारकत मिळण्याकरीता तगादा लावला. तसेच रु.१ कोटी रकमेची मागणी केली. अर्जदार क्र.१ ने स्वतःहुन जाबदाराचा त्याग केला आहे. जाबदार हा अर्जदार क्र.१ हिला नांदविण्यास तयार होता व आहे.

०८) अर्जदार क्र.१चे शिक्षण बी.कॉम.बी.एड. झाले आहे. ती डॉ.डी.एस.आहेर पब्लीक स्कुल, विठेवाडी, ता.देवळा येथे शिक्षक पदावर नोकरीस आहे. तिला दरमहा रु.३० ते ३५ हजार पगार मिळतो. तसेच खाजगी शिकवणीमधून दरमहा रु.२० ते २५ हजार मिळतात. तसेच वडीलांच्या बागायती शेतीमधुन उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे.

०९) अर्जदारांकरीता विद्वान विधीज्ञा श्रीमती एच.बी.ठुबे व जाबदारकरीता विद्वान विधीज्ञा श्रीमती व्ही.जे. बाविस्कर यांचा युक्तिवाद ऐकला.

१०) माझे विचारार्थ उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ ही जाबदाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे का ?, असल्यास किती ? | नाही. |
| २. | अर्जदार क्र.२ व ३ हे जाबदाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे का ?, असल्यास किती ? | होय. अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ३. | अर्जदार क्र.१ ने स्वतःहुन जाबदाराचा त्याग केल्याचे जाबदाराने सिध्द केले आहे का ? | संबध्द नाही. |
| ४. | आदेश कोणता ? | अंतिम आदेशाप्रमाणे... |

## कारणमिमांसा

**११)** अर्जदार क्र.१ हिने स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (निशाणी ३०) दाखल केले आहे. जाबदाराने त्याचे प्रतिज्ञापत्र (निशाणी ६४ ) दाखल केले आहे. दोन्ही पक्षकारांनी कागदपत्रे दाखल केली आहेत. त्यांचा आवश्यक तेथे उल्लेख करणे योग्य राहिल.

**१२)** अर्जदारातर्फे विद्वान विधिज्ञा यांनी असा युक्तीवाद केला की, जाबदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये अर्जदार व जाबदार यांच्यातील विवाह मान्य केला आहे. तसेच विवाह संबंधातून दोन अपत्ये झाल्याचे कबुल केले आहे. त्याचप्रमाणे त्यांचे म्हणणे व अर्जदार हिचा उलटतपास पाहता दोघेही पती पत्नी म्हणून समाजात राहत होते असे त्यांनी कबुल केले आहे. त्यामुळे दोघांतील पती पत्नीचे नातेसंबंध याप्रकरणी शाबीत झाले आहे.

**१३)** पुढे असा युक्तीवाद करण्यात आला की, अर्जदार क्र.१ने तिच्या पुराव्यामध्ये जाबदाराने तिला घरातून हाकलून दिले असे कथन केले आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ने स्वतःहुन जाबदाराचा त्याग केला नसल्याचे दिसून येते. जाबदाराने

अर्जदार क्र.२ व ३ यांची देखभाल केली नाही. त्यांच्या उदरनिर्वाहाचा तसेच शिक्षणाचा खर्च केलेला नाही. त्यामुळे जाबदाराने अर्जदारांवर दुर्लक्ष केल्याचे शाबीत होते.

**१४)** पुढे असा युक्तीवाद करण्यात आला की, अर्जदार क्र.१ व जाबदार हे पती पत्नी सारखे राहत होते व त्यांना त्यातून दोन मुले झाली आहेत हे जाबदाराने त्याच्या म्हणण्यात व पुराव्यात कबुल केले आहे. तसेच त्यांच्या विवाहाची नोंदणी देखील झालेली आहे. केवळ दुसरी पत्नी म्हणून जाबदार यास अर्जदार क्र.१ हिच्या सांभाळण्याची जबाबदारी टाळता येणार नाही. त्याकरीता ***चनमुनिया विरुध्द विरेंद्रकुमार सिंग कुशवाह, (एआयआर २०१०, सुप्रिम कोर्ट (पुरवणी) २९),*** या न्यायनिवाडयाचा आधार घेतला आहे.

> *या न्यायनिवाडयामधील पुरुषाने महिलेसोबत कायदेशीर लग्नाच्या पुर्तता न करता देखील दिर्घकाळ जीवन व्यतित केले असेल तर पुरुषाने तिचा त्याग केला किंवा दुर्लक्षीत केले तर तो त्या महिलेस पोटगी देण्यास जबाबदार असतो. पुरुषाला त्याला स्वतःच्या चुकीचा फायदा घेण्यास परवानगी देता येणार नाही. यापेक्षा कायदयाचा वेगळा अर्थ लावल्यास एक महिलेला निराधार व्हावे लागेल, जो फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ च्या तरतुदीद्वारे रोखण्याच्या उद्देशाने बनविला आहे.*

**१५)** याउलट, जाबदारातर्फे विद्वान विधिज्ञा यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार क्र.१ व जाबदार यांचा दोघांचाही हा दुसरा विवाह आहे याबाबत वाद नाही. अर्जदार हिने घटस्फोट घेतल्याचे कोणतेही कायदेशीर कागदपत्र शाबीत केलेले नाही. त्यामुळे मुळात सदरचा अर्ज करण्यास अर्जदाराला अधिकार नाही.

**१६)** पुढे असा युक्तीवाद करण्यात आला की, तोंडी शब्दाशिवाय जाबदाराने

अर्जदार क्र.१ला त्रास दिल्याबाबत कोणताही पुरावा नाही. अर्जदाराने आजतागायत छळाबाबत कोठेही तक्रार केलेली नाही. जाबदाराने त्यांच्या मुलांची वेळोवेळी शाळेत फी भरली आहे. तो वेळेत अंतरिम पोटगी भरीत आहे. त्यामुळे जाबदाराने अर्जदारांकडे दुर्लक्ष केले असे म्हणता येणार नाही.

**१७)** पुढे अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञा यांनी प्रत्युत्तराद्वारे असा युक्तीवाद केला की, अर्जदार क्र.१ हिने मुलांच्या शाळेची फी भरल्यानंतर जाबदाराने पुन्हा ती फी भरली आहे. ती फी परत करण्याकरीता शाळेत अद्याप प्रलंबित आहे.

**मुद्दा क्र.१ बाबत :– (नातेसंबंधाबाबत)**

**१८)** सदर प्रकरणी जाबदाराने अर्जदार क्र.१ सोबतचा वैवाहिक नातेसंबंध अवैध असल्यामुळे फौ.प्र.सं.कलम १२५ प्रमाणे अर्जदार क्र.१ ही ''पत्नी'' या व्याख्येत बसत नाही असा बचाव घेतला आहे. त्यामुळे सदरचा मुद्‌यावर प्रथम निर्णय देणे आवश्यक आहे.

**१९)** जाबदाराने त्याच्या म्हणण्यामध्ये व पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (निशाणी ६४) यामध्ये त्याचा व अर्जदार क्र.१ दोघांचाही सदरचा दुसरा विवाह असल्याचे कथन केले आहे. अर्जदार क्र.१ने देखील तिच्या अर्जामध्ये व पुराव्यामध्ये तिचा व जाबदार यांचा दि.०८/०३/२०११ रोजी विवाह झाल्याचे कथन केले आहे. तिने उलटतपासामध्ये हे कबुल केले आहे की, जाबदारासोबत तिचा दुसरा विवाह आहे. तिचा पहिल्याविवाहामध्ये घटस्फोट झालेला नाही. परंतु, सदरची तथ्ये अर्जदार क्र.१ने तिच्या अर्जामध्ये कथन केलेले नाहीत. अर्जदार क्र.१ व जाबदार यांचा दोघांचाही हा दुसरा विवाह असल्याचे दोघांनीही कबुल केले आहे. कबुल केलेले तथ्य सिध्द करण्याची आवश्यकता राहत नाही.

**२०)** जाबदाराने त्याच्या म्हणण्याप्रमाणे व पुराव्याप्रमाणे अर्जदार क्र.१ ने

तिच्या पुर्वीच्या विवाहाचा नोटरी व जिल्हा न्यायालय, मालेगांव येथील निकालाप्रमाणे घटस्फोट झाला आहे असे तिने जाबदारास कथन केले. तिच्या कथनावर विश्वास ठेवून जाबदाराने अर्जदार क्र.१ सोबत विवाह केला. यावरुन असे दिसून येते की, अर्जदार क्र.१ हिचा घटस्फोट झाला आहे या तथ्यावर विश्वास ठेवून जाबदाराने अर्जदार क्र.१सोबत विवाह केला. परंतु, अर्जदार क्र.१ हिने तिचा पहिल्या विवाहाचा घटस्फोट झाला नाही हे माहित असून देखील जाबदारासोबत विवाह केला. त्यामुळे जाबदार हा त्याच्या चुकीचा फायदा घेत आहे हे शाबीत होत नाही.

२१) फौ.प्र.सं.कलम १२५ प्रमाणे पत्नी ही पतीकडून पोटगी मिळण्यास पात्र असते. पत्नीच्या व्याख्यामध्ये घटस्फोटीत परंतु पुर्नविवाह न झालेली महिला देखील समाविष्ट आहे. परंतु, दुसरी पत्नी त्या व्याख्येमध्ये समाविष्ट नाही.

२२) त्या संदर्भात माननीय सर्वोच्च न्यायालयाने **यमुनाबाई आढाव वि. अनंतराव आढाव, १९८८ एआयआर (सर्वोच्च न्यायालय) ६४४,** या न्यायनिवाडयामध्ये–

> *एखाद्या महिलेचा हिंदू प्रथेनुसार, जिवंत जोडीदार असलेल्या पुरुषाशी विवाह करणे कायद्याच्या दृष्टीने पूर्णपणे रद्दबातल आहे आणि तिला संहितेच्या कलम १२५ चा लाभ मिळण्यास पात्र नाही असे कायदेशीर तत्व नमुद केले आहे.*

२३) **बादशाह वि. उर्मिला गोडसे, एआयआर २०१४ (सर्वोच्च न्यायालय) ८६९,** या न्यायनिवाडयामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने असे मत नोंदविले आहे की–

> *यमुनाबाई आढाव (पुर्वोक्त) आणि सविताबेन भाटीया वि. गुजरात सरकार प्रकरणांमधील या न्यायालयाचे निकाल फक्त*

*अशा परिस्थितीतच लागू होतील जिथे एखाद्या महिलेने पहिल्या विवाहाची पूर्ण माहिती असलेल्या पुरुषाशी लग्न केले असेल. अशा प्रकरणांमध्ये, तिला हे माहित असले पाहिजे की अशा व्यक्तीशी दुसरे लग्न करणे अनअनुज्ञेय आहे आणि हिंदू विवाह कायद्यानुसार त्यावर बंदी आहे आणि म्हणून तिला त्याचे परिणाम भोगावे लागतात. हा निकाल अशा प्रकरणांमध्ये लागू होणार नाही जिथे एखाद्या पुरुषाने पहिल्या विवाहाबद्दल त्या महिलेला अंधारात ठेवून दुसरे लग्न केले.*

२४) अर्जदारातर्फे दाखल करण्यात आलेला ***चनमुनिया (पुर्वोक्त)*** याचे विवेचन देखील ***बादशाह (पुर्वोक्त)*** या प्रकरणात केले आहे. ***चनमुनिया (पुर्वोक्त)*** या प्रकरणामध्ये एक महिला व पुरुष विवाहाचे विधी पार न पाडता पती पत्नी सारखे एकत्र म्हणजेच लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. तो निवाडा लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणा–या नातेसंबंधाबाबत आहे. तो या प्रकरणास लागु होत नाही.

२५) अर्जदार क्र.१ हिचा स्वतःचा पुर्वीचा विवाह संबंध कायदेशीररित्या रद्द झाला नाही हे माहित असून देखील व जाबदाराचा पुर्वीचा विवाह माहित असून देखील अर्जदार क्र.१ ने जाबदारासोबत दुसरा विवाह केला आहे. त्यामुळे ***बादशाह (पुर्वोक्त)*** या माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयातील प्रस्थापित कायदयाच्या तत्वानुसार अर्जदार क्र.१ हिला कायदेशीर परिणामास सामोरे जावे लागेल. त्यामुळे ती फौ.प्र.सं.चे कलम १२५ प्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र नाही. त्याप्रमाणे मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नोंदविला आहे.

**मुद्दा क्र.२ बाबतः–**

२६) फौ.प्र.सं.कलम १२५(ब) प्रमाणे प्रत्येक व्यक्तीवर औरस व अनौरस

अज्ञान मुलगा व कलम १२५(क) प्रमाणे औरस व अनौरस अविवाहीत मुलगी व शारिरीक व मानसिकदृष्टया असामान्य व्यक्तींच्या पोटगीची जबाबदारी असते.

२७) सदर प्रकरणामध्ये अर्जदार क्र.२ ही जाबदाराची मुलगी व अर्जदार क्र.३ हा जाबदाराचा मुलगा आहे. अर्जदार क्र.२ चे वय सन २०२२ मध्ये ११ वर्षे नमुद आहे म्हणजेच तिचे सध्याचे वय जवळपास १६ वर्षे आहे. अर्जदार क्र.३ चे अर्जामध्ये नमुद नाही. दायित्वाचे प्रतिज्ञापत्र (निशाणी १६) मध्ये अर्जदार क्र.३ चे वय सन २०२३ साली ८ वर्षे नमुद आहे. त्यामुळे त्याचे सध्याचे वय जवळपास ११ वर्षे आहे. अर्जदार क्र.२ व ३ हे स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ असल्याचे जाबदाराचे कथन नाही किंवा तसा कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अर्जदार क्र.२ व ३ हे जाबदाराकडून पोटगी मिळण्यास पात्र आहेत.

२८) अभिलेखावरील पुराव्यानुसार जाबदार हा महाविद्यालयामध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून नोकरीस आहे व डिसेंबर–२०२५ या महिन्यामध्ये त्याचा एकुण रु.१,५५,९०५/– पगार आहे. तो सन २०१५ पासुन त्या महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून नेमणुकीस आहे.

२९) अर्जदार क्र.१ च्या दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये जाबदार व अर्जदार यांची एक सामाईक शेती आहे असे नमुद आहे. जाबदार याच्या दायित्वाच्या प्रतिज्ञापत्रानुसार त्याचे शिक्षण एम.ए.सेट झाले आहे. त्याने त्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये अर्जदार क्र.१ हिच्या अचल मालमत्तेचे वर्णन नमुद केले आहे. परंतु, स्वतःची कोणतीही चल व अचल मालमत्ता नसल्याचे नमुद केले आहे.

३०) अर्जदार क्र.१ हिने दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार (निशाणी ८९/२)कडे फेरफार नोंदवहीच्या उता–यावरुन जाबदार याने दि.११/१०/२०२४ रोजी एक भुखंड खरेदी घेतल्याचे दिसून येते. परंतु, त्याचे वर्णन त्याने प्रतिज्ञापत्रात

वगळयाचे दिसून येते. अर्जदार क्र.१ हिने त्या संदर्भात स्वतंत्र अर्ज (निशाणी ९०) देवून जाबदारावर फौजदारी कारवाई करण्याची विनंती केली आहे. परंतु, दायित्याच्या प्रतिज्ञापत्राचा उद्देश हा त्या पक्षकाराच्या ज्ञानामधील सर्व माहिती न्यायालयासमोर येणे हा आहे. पक्षकारावर कारवाई होणे हा त्याचा मुळ उद्देश नाही. सदर भुखंडामधून जाबदारास उत्पन्न मिळते हे दर्शविणारा पुरावा नाही. सदरचा वाद हा पक्षकारांमधील कौंटुंबिक वाद आहे. त्यामुळे त्यावरुन त्याच्यावर कारवाई न केल्यामुळे अर्जदारांवर कोणताही अन्याय होणार नाही. त्यामुळे तो अर्ज निकाली करणे आवश्यक आहे.

३१) जाबदारावर त्याच्या आईवडीलांची देखील जबाबदारी आहे असे त्याने कथन केले आहे. परंतु, उलटतपासामध्ये त्याला भाऊ असून तो शिक्षक म्हणून नोकरी करतो असे त्याने कथन केले आहे. त्यामुळे ती जबाबदारी सांभाळण्यासाठी त्याच्या भावाची देखील त्याला मदत आहे.

३२) अभिलेखावर उपलब्ध कागदपत्रांवरुन अर्जदार क्र.२ व ३ हे इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेत आहेत. अर्जदार क्र.२ ही सन २०२२ मध्ये इयत्ता ४थी वर्गात व अर्जदार क्र.३ हा सन २०२१ मध्ये प्रथम वर्गात शिक्षण घेत होते असे नमुद आहे. अर्जदार क्र.१ हीने आजरोजी न्यायालयासमोर कथन केले की, अर्जदार क्र.२ ही सध्या इयत्ता ८वी मध्ये व अर्जदार क्र.३ हा इयत्ता ५वी मध्ये शिकत आहे. त्यांची केवळ शाळेची वार्षिक फी प्रत्येकी जवळपास रु.२५,०००/– आहे. त्यांच्या शिक्षणाचा इतर व वैद्यकीय खर्चाचा व जाबदाराच्या उत्पन्नाचा विचार करता अर्जदार क्र.२ व ३ यांना दरमहा प्रत्येकी ७०००/– पोटगी देणे रास्त ठरणार आहे.

३३) निशाणी ५ वरील आदेशानुसार अर्जदार क्र.२ व ३ यांना मुळ अर्ज दाखल तारखेपासुन म्हणजेच मार्च–२०२२ पासुन प्रत्येकी रु.२०००/– पोटगी मंजुर करण्यात आली होती. अर्जदार क्र.२ व ३ यांना प्रत्येकी रु.७०००/– पोटगी ही मुळ

अर्ज दाखल तारखेपासून मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज दाखल तारखेपासून त्यांना मिळालेली पोटगी वजा करता फरकासह उर्वरित पोटगी मिळणेस पात्र आहेत. त्याप्रमाणे मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष नोंदविला आहे.

**मुद्दा क्र.३ बाबत :–**

३४) अर्जदार क्र.१ ही फौ.प्र.सं.चे कलम १२५ प्रमाणे 'पत्नी' या संज्ञेत बसत नसल्यामुळे सदरचा मुद्दा हा असंबध्द (irrelevant) राहतो. त्याप्रमाणे मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष नोंदविला आहे. सबब, मुद्दा क्र.४ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला. |
| २. | जाबदाराने अर्जदार क्र.२ व ३ यांना अर्ज दाखल तारखेपासून प्रत्येकी दरमहा रु.७,०००/– पोटगी दयावी. |
| ३. | अंतरिम पोटगीची मिळालेली रक्कम वजा जाता उर्वरित फरकाची मागील थकीत पोटगी वसुल करण्यास अर्जदार क्र.२ व ३ पात्र आहेत. |
| ४. | सदर अर्जाचा खर्च रक्कम रु.५,०००/– जाबदाराने अर्जदार क्र.२ व ३ यांना दयावा. |
| ५. | अर्ज (निशाणी ९०) निकाली करण्यात आला. |
| ६. | सदर न्यायनिर्णयाची मोफत प्रत अर्जदार क्र.२ व ३ तर्फे अर्जदार क्र.१ हिला व जाबदार यांना द्यावी. |

स्वा/–

ठिकाण – पिंपळगांव ब. **(ए. जे. पाटील)**

दिनांक – १२/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

पिंपळगांव ब.

**Visit ecourts.gov.in for updates or download mobile app “eCourts Services” from Android or iOS**